अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। शुक्रवार, दि. ६ सप्टेंबर २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३३८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




## आग लागल्याने ड्रायव्हरसह दोघे जखमी

**सोलापूर :** ट्रक घेऊन जात असताना समोरच्या मोटारीला धडकल्याने ट्रकच्या केबिनमध्ये आग लावून ड्रायव्हरसह दोघेजण जखमी झाले. हा अपघात टेंभुर्णी ते करमाळा रोडवरील करमाळा जवळ बुधवारी दुपारच्या सुमारास घडला. नागराज शट्टर(वय ३५) आणि विजयकुमार (वय ३२ दोघे रा.तामिळनाडू) अशी भाजून जखमी झालेल्या चालकांची नावे आहेत. त्यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. नागराज शट्टर हा बुधवारी दुपारी टीएन५२ - डब्ल्यूए- ८७३४ या क्रमांकाचा ट्रक घेऊन टेंभुर्णी ते करमाळ्याकडे निघाला होता. टेंभुर्णी पासून २५ किलोमीटर अंतरावर समोरची कार अचानक ब्रेक लावल्याने ट्रक पाठीमागून कारला धडकला. त्यावेळी

# रूळावर दगड ठेवून लूटमारीचा डाव

# लोकोपायलटच्या सतर्कतेने फसला

**कुर्डुवाडी/प्रतिनिधी**


**कुर्डुवाडी रेल्वे स्थानकापासून सोलापूरच्या दिशेने साधारण अर्धा ते एक कि.मी अंतरावर सिग्नल पॉइंट जवळ रेल्वे रूळावर मोठा दगड (सिमेंट स्लीपर) व सिग्नलच्या कप्लिंगमध्ये दगडे ठेऊन घातपात घडविण्याचा डाव आखला गेला होता. टॉवर वॅगन येण्यापूर्वी पॅसेंजर ट्रेन आली असती तर मोठा अपघात वा लुटमारीसारखी मोठी दुर्घटना घडली असती. सुदैवाने लोकोपायलटच्या सतर्कतेमुळे ही दुर्घटना टळली. याबाबत लोकोपायलटचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

रेल्वे लोकोपायलट रियाज शेख यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. ही घटना बुधवार दि.४ रोजी रात्री ८.१५ वाजता सुमारास कुर्डुवाडी स्थानकाजवळ सोलापुरकडे जाण्याच्या दिशेला घडली. अशाप्रकारे घातपात घडवून गाडी लुटण्याचा प्रयत्न होता का? असा प्रश्न उपस्थित केला गेला आहे. याबाबत कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत सिनिअर सेक्शन इंजिनिअर कुंदनकुमार यांनी कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत अज्ञाता विरुद्ध फिर्याद दाखल केली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की- इलेक्ट्रिक रेल्वेच्या ओव्हरहेड वायरींची देखभाल करण्यासाठी असणारी टॉवर वॅगन ही मलिकपेठहून कुर्डुवाडीकडे येत असताना कुर्डुवाडी रेल्वे स्थानकापासून अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर सिग्नल पॉइंटजवळ मोठा दगड रुळाच्या बाजूला रेल्वे लोकोपायलट व गार्ड यांच्यासाठी सुचित करणारा फॉलोइंग मार्कचा दगड(स्लीपर) कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी उचलून लूटमार, घातपाताच्या उद्देशाने रेल्वे रूळावर ठेवला व सिग्नल पॉइंटमध्ये ही दगडे ठेवली होती.

यावेळी त्या मार्गावरुन पॅसेंजर ट्रेन येण्यापूर्वी इलेक्ट्रिक रेल्वेच्या ओव्हरहेड वायरची देखभाल करणारी टॉवर वॅगन ट्रेन मलिकपेठहून कुर्डुवाडीकडे रात्री ८.१५ वाजता सुमारास आली. त्यावेळी टॉवर वॅगनचे लोकोपायलट रियाज शेख, जे ई उमेश ब्रदर यांना रेल्वे रूळावर काही तरी ठेवल्याचे दिसले. त्यांनी सतर्कता बाळगत सुमारे दोनशे मीटर अंतरावर गाडी थांबवून याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना दिली. त्वरित रेल्वेचे अधिकारी, पोलीस, रेल्वे सुरक्षाबलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. संबंधित कर्मचाऱ्यांनी दगड हटवून रेल्वेला मार्ग मोकळा करून दिला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून फिर्यादी दि.४ रोजी रात्री ८.१८ वाजताच्या सुमारास त्यांच्या ऑफिसमध्ये काम करीत असताना त्यांना रेल्वे इंजिनीअरींग कट्रोल रूम सोलापूर येथून फोन आला. कुर्डुवाडी रेल्वेस्टेशन जवळ इलेक्ट्रीकल खांब नं.३७७ ३-५ चे मध्ये अप मेन लाईनवर फॉलींग मार्कचा दगड रेल्वे ट्रॅकवरती कोणीतरी अज्ञात इसमाने उचलून ठेवला आहे.त्यानंतर फिर्यादी हे ट्रॅक मॅन यांना सोबत घेवून घटनास्थळी गेले. त्यावेळी रेल्वे सहा पोलीस उपनिरीक्षक राऊत ,रेल्वे सुरक्षा बलाचे सी.टी. प्रदीपकुमार व पॉईटसमन सातपुते व पॉईटसमन तुपे असे सर्व मिळून वरील घटनास्थळाचा फॉलींग मार्कचा दगड हा रेल्वे ट्रॅकवरून बाजूस काढत होते. सदरचा दगड रेल्वे लाइनवरून बाजूस काढून रात्री ८.२५ वा. रेल्वे लाईन सुरळीत केली. याबाबत फिर्यादी कुंदनकुमार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलिस अधिकारी वाय, डी. शिंदे हे करीत आहेत.



**सोलापूर : कुर्डुवाडी रेल्वे स्टेशनच्या रुळावर दगड ठेऊन (सिमेंट स्लीपर) टाकून रेल्वेचा घातपात करण्याचा प्रयत्न होता. लोकोपायलटच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.**

### डॉग स्कॉडने केली पाहणी

घटनास्थळावर पोलीसांनी डॉग स्कॉडने पाहाणी करण्यात आली तसेच सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. मात्र, त्याबाजूचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाली नाहीत, अशी माहिती तपास अधिकारी वाय डी शिंदे यांनी दिली.

## प्रेम विवाह केला म्हणून सोलापूरच्या तरुणास मारहाण

**सोलापूर/प्रतिनिधी**

प्रेम विवाह केल्यानंतर मुलींच्या आई वडिलांना भेटण्यास भोसरी येथे गेलेल्या सोलापूरच्या तरुणास झोपेच्या गोळ्या देऊन मोटारींत लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना भोसरी ते भिगवण या दरम्यान गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडली.

प्रमोद दीपक जाधव (वय २५ रा. मंजुनाथ नगर, सेटलमेंट फ्री कॉलनी, सोलापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी निलेश गायकवाड (भाऊजी) यांनी गुरुवारी सकाळी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्रमोद जाधव हा भोसरी (पुणे) येथील एका तरुणी बरोबर प्रेम विवाह केला होता. मुलींच्या आई-वडिलांना भेटण्यासाठी प्रमोद जाधव हा भोसरी (पुणे ) येथे गेला होता. बुधवारी रात्री १२ वाजेनंतर त्याला पंकज लोखंडे, किरण वाघमारे, रोहित गायकवाड आणि मुलींच्या आई-वडिलांनी मिळून त्याला प्रेमविवाह का केला. असे म्हणत झोपेच्या गोळ्या बळजबरीने दिले. आणि त्याला मारुतीव्हॅन मध्ये बसवून भोसरी ते भिगवण या मार्गावर दाथाबुक्याने मारहाण केली. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## ७५ गुंतवणूकदारांना लावला ४ कोटींचा चुना

### दोन महिला संशयित आरोपींना अटक

**सोलापूर/प्रतिनिधी**

श्रीगणेश फायनान्स व संत सेवालाल निधी लिमिटेड मार्फत सोलापुरातील गुंतवणूकदार यांची फसवणूक केलेल्या संशयित आरोपींपैकी दोन महिला संशयित आरोपींना गुरुवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास हैदराबाद रोडवर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून,सोमवारपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या गुन्ह्यात ७५ गुंतवणूकदार यांची ४ कोटी १६ लाख ७६ हजार फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या घटनेची हकिकत अशी की,फिर्यादी योगेश नागनाथ पवार (रा.धुम्मा वस्ती) यांची जिल्हा परिषदेत जून २०२२ रोजी संशयित आरोपी शिवाजी गोपाळ जाधव यांच्याशी ओळख झाली होती. फिर्यादीने पन्नास




हजाराची गुंतवणूक केली. परंतु संशयित आरोपीने त्यांना निधी बँकेच्या ठेव बुक मधील ७५६ क्रमांकाच्या पावतीवर ठेव पावती दिली आणि ऑक्टोबर २०२२ पासून डिपॉझिटवर महिना ५०० रूपये प्रमाणे परतावा देण्याचा शब्द दिला. त्यानंतर फिर्यादी यांना पैशाची गरज असल्याने फिर्यादीने आरोपीस परतावा रक्कमेची मागणी केली असता,ठेव रक्कम परत न देता फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. असा गुन्हा दाखल करण्यात झाला होता. या गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा,सोलापूर शहर येथे सुरु आहे. या गुन्ह्यातील संशयित आरोपी सुनिता शिवाजी जाधव, (वय-५२,रा.साफल्य नगर, सैफुल,विजापूर रोड,सोलापूर),पूजा सचिन जाधव (वय-२८,रा.साफल्य नगर, सैफुल, विजापूर रोड,सोलापूर) या गुन्हा दाखल झाल्यापासून, गुन्ह्यात स्वतःची अटक टाळण्याकरिता परागंदा झाले होते. गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीवरुन या दोन्हीं महिला संशयित आरोपी यांना फानुस हॉटेल, हैद्राबाद रोडवरुन पोलीस महिला अंमलदार यांच्या मदतीने गुरुवारी दुपारच्या सुमारास ताब्यात घेऊन अटक केली. ही काम गिरी पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शहाजी पवार,पोलीस हवालदार काशिनाथ धारसंगे,राजेश पुणेवाले,स्नेहा किणगी,जे.एन.गुंड,परशुराम लांबतुरे यांनी केली आहे

## फिरण्यास गेलेल्या इसमास मारहाण करून पैसे लुटले

- ७ दरोडेखोरांना अटक
- तळे हिप्परगा येथील घटना

**सोलापूर/प्रतिनिधी**

फिरण्यासाठी गेलेल्या इसमास अनोळखी तरुणांनी मारहाण करून १ हजार रुपये रोख आणि फोन पे वरून ४३ हजाराची रक्कम लुटून पोबारा केला. ही दरोड्याची घटना तळे हिप्परगा (ता. उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली.या प्रकरणात सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी ७ जणांना अटक करून रविवार पर्यंतची पोलीस कोठडी घेतली आहे.

यासंदर्भात स्वप्निल चंद्रकांत भानप (वय ४९ रा. रेल्वे लाईन, डफरीन चौक सोलापूर) यांनी सोलापूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी ७ जणांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास स्वाप्निल भानप हे तळे हिप्परगा येथील सावर अँड टॉवर या बागेत गेले होते. बाग बंद असल्याने ते हिप्परगा तलाव परिसरात फिरत होते त्यावेळी सहा ते सात अनोळखी तरुणांनी मिळून त्यांना हाताने आणि काठीने मारहाण केली.त्यांच्या खिशातील १ हजार रुपये काढून घेतले. तसेच त्यांच्या फोन पे वरून ४३ हजारांची रक्कम काढून घेतले होते. हा प्रकार घडल्यानंतर भानप यांनी बुधवारी सायंकाळी पोलिसात फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी ७ जणांवर गुन्हा दाखल केला होता.

### यांना केली अटक

पोलिसांनी सूर्यकांत लिंबण्णा कोरे, सोन्या सुदाम किरतकुडवे, धम्मपाल दयानंद कांबळे, राहुल सिद्धार्थ सीताफळे, श्रवण कोमल गायकवाड, विलास रेवण गायकवाड आणि सोहेल नजीर पठाण (सर्व रा.सोलापूर) अशा ७ जणांना अटक केली.

## शेगाव दुमाला येथे मोटारीच्या धडकेने पादचारी तरुण ठार

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पायी जात असताना पाठीमागून चारचाकी मोटर धडकल्याने पादचारी तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शेगाव दुमाला (ता.पंढरपूर) येथील तीनरस्ता चौकाजवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडला. विजय उर्फ बाळासाहेब रमेश अभंगराव (वय ३६ रा.जुनी पेठ पंढरपूर ) असे मयताचे नाव आहे. तो आणि त्याचा मित्र युनूस इस्माईल तांबोळी (रा.अनिल नगर पंढरपूर) हे मंगळवारी रात्री १० वाजेच्या सुमारास पंढरपुरातील दुर्गा हॉटेल कडून चालत निघाले होते. शेगाव दुमाला येथील सावली हॉटेल समोर आले असता पाठीमागून अनोळखी मोटार धडकल्याने अभंगराव हा गंभीर जखमी होऊन मरण पावला.

## पुणे शहर उपायुक्तपदी तेजस्वी सातपुतेंची नियुक्ती


**पोलीस प्रशिक्षण केंद्राचे विजय चव्हाण प्राचार्य**

**सोलापूर :** राज्यातील ६ आयपीएस पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून बृहन्मुंबईच्या पोलीस उपायुक्त तेजस्वी सातपुते यांची बदली पुणे शहर उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे तर राज्य राखीव पोलीस बल गट क्र १०,सोलापूर येथील समादेशक विजय चव्हाण यांची सोलापुरातच पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

तेजस्वी सातपुते ह्या मुंबईला बदलून जाण्याअगोदर सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे अधीक्षक म्हणून कर्तव्य बजावले आहे.सिंघम महिला अधिकारी म्हणून त्यांची पोलीस दलात विशेष ओळख आहे

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



साहेब, माझी अंटाटीका पोस्ट ऑफिसला बदली करा !

| कल्याण |
|---|
| 890-72-589 |

| मुंबई |
|---|
| 145-09-667 |

## महायुतीच्या सरकारने महाराष्ट्राची वाट लावण्याचे ठरवलेय

### टेंभुर्णीच्या सभेत जयंत पाटलांची टोलेबाजी

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे गुरूवारी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते.माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे झालेल्या एका कार्यक्रमात पाटलांनी राज्यातील महायुतीच्या सरकारवर कडाडून टीका केली. महाराष्ट हे राज्य सुरक्षित राहिलेले नाही.राज्यात अस्थिरता आणि भीतीचे वातावरण असताना हे सरकार इव्हेंट करत सुटले आहे.सरकारची विकृती पाहाता शिंदे-पवार-अजितदादा यांच्या सरकारने महाराष्ट्राची वाट लावण्याचे ठरवल्याचे दिसते,अशा शब्दात पाटलांनी सरकारवर



फटकेबाजी केली.

आज राज्यातील आमच्या लाडक्या बहिणी सुरक्षित नाहीत. आठवड्यातून, दोन आठवड्यातून अतिशय घृणास्पद प्रकार समोर येत आहेत. शाळेतील लहान बालिका देखील सुरक्षित नाहीत. या सरकारला राज्यातील कायदा व सुव्यवस्था टिकवता आली नाही. महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था संपलेली आहे. पुणे शहरात नगरसेवकाचा खून झाला. लोकांनी ती क्लिप बघावी, पंधरा सेकंदात माणसे येतात आणि गोळ्या घालून पळून जातात.महाराष्ट्रामध्ये चाललेय काय? नागपूर या गृहमंत्र्याच्या जिल्ह्यात पोलीस स्टेशनमध्ये पोलीस जुगार खेळताना सापडले. या महाराष्ट्राची पूर्ण वाट लावण्याचे सरकारने ठरवले आहे,अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला.टेंभुर्णी येथे सूरज देशमुख व रावसाहेब देशमुख यांच्या पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. शिवाजी महाराजांनी सुरत लुटल्याचा इतिहास हा काँग्रेसने आपल्याला शिकवला वास्तविक महाराजांनी सुरत लुटले नव्हते, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. आता यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केला आहे. महाराष्ट्राचा इतिहास बदलण्याचं पाप कोणाच्या तरी मनात असल्याचे जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

### ती अक्षम्य चूक, माफी नाहीच

या महाराष्ट्रात मराठी माणसं काहीही मान्य करतील. पण, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यामध्ये झालेला भ्रष्टाचार आणि पुतळा उभा करण्यामध्ये झालेली अक्षम्य चूक कधीही माफ करणार नाही. याचं प्रायश्चित्त सरकारला द्यावं लागेल, अशी टीका जयंत पाटील यांनी केली.

### तुतारी वाजवणाऱ्याच्या मागे उभे राहा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची हेळसांड करणाऱ्या सरकारला महाराष्ट्रात धडा शिकवायचं काम आपल्याला करायचे आहे. लोकसभेला ज्या पद्धतीने माढा विधानसभेमध्ये मताधिक्य दिले तसेच विधानसभेला तुतारी वाजवणाऱ्या माणसाच्या पाठीमागे भक्कम पणे उभं राहा, असे आवाहन देखील जयंत पाटील यावेळी केले.

## दुचाकी घसरल्याने चालक ठार

**पंढरपूर :** वेगाने जात असताना दुचाकी घसरल्याने चालक गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात पंढरपूर ते शेटफळ रोडवरील बाभुळगाव जवळ बुधवारी दुपारच्या सुमारात घडला. मारुती अंकुश जावळे (वय ३८ रा.माढा) असे मयताचे नाव आहे. ते काल दुपारी ४ वाजेच्या सुमारास आपल्या बॉक्सर मोटरसायकल वरून पंढरपूर येथे गेले होते. दुपारी ४ वाजता गावाकडे परत येत असताना बाभुळगाव जवळील हॉटेल जवळ हा अपघात घडला. या अपघाताची फिर्याद मयताचे मेहुणे गणेश चौरे (रा. माढा) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात दाखल केला.

**४६ लाखांना फसवले**

सोलापूर : व्यवसायात पैसे गुंतवणूक करून नफ्यातील ५० टक्के रक्कम देतो म्हणून ४६ लाखाला फसवणूक केल्याची घटना जुन २०२३ ते सप्टेंबर २०२३ दरम्यान घडली. याप्रकरणी इस्माईल राहअहमद शेख (वय-३८,रा.जॉबवीर ऑफ हाउसिंग सोसायटी,मुस्लिम पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून इस्माईल अ.सत्तार कुरेशी (रा.मुस्लीम पाच्छा पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.